आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१५ ऑक्टोबर २०२६ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- पुन्हा धर्मांतर करून हिंदू धर्मात परतलेल्यांना आरक्षणाचे लाभ आपोआप मिळणार नसल्याचं सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट

- राज्य सरकारकडून सुट्या मसाल्यांच्या विक्रीला बंदी

- सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि पदपथांवर फटाके वाजवण्यावर मुंबई उच्च न्यायालयाकडून बंदी

- पाकिस्तानात पेशावरमध्ये शाळेचं छत कोसळून ३५ जणांचा मृत्यू, ४० जण जखमी

आणि

- नैऋत्य मौसमी पाऊस संपूर्ण देशभरातून माघारी, सरासरीपेक्षा साडे १२ टक्के कमी पावसाची नोंद

<><><><><>

हिंदू धर्मांतून इस्लाममध्ये धर्मांतर केलेल्या व्यक्तीला आधीच्या मागास प्रवर्गाचे लाभ देण्याचा तामिळनाडू सरकारचा निर्णय रद्द करणाऱ्या मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयानं शिक्कामोर्तब केलं आहे. राज्य घटनेच्या तरतुदीनुसार अनुसूचित जातीतल्या व्यक्तीनं हिंदू, शीख किंवा बौद्ध यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्याला किंवा तिला अनुसूचित जातीचा सदस्य मानता येणार नाही, याकडे सर्वोच्च न्यायालयानं लक्ष वेधलं. अशा व्यक्तीनं पुन्हा हिंदू धर्म स्वीकारला तरी त्याला पुन्हा अनुसूचित जातींसाठी असलेले लाभ आपोआप मिळणार नाहीत, असंही न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेतल्या कथित अनियमिततेप्रकरणी विरोधी पक्षांनी सर्वोच्च न्यायालयावर काढलेल्या मोर्चाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयानं आज काँग्रेस नेते राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यासह इतरांना नोटिसा बजावल्या. सर्वोच्च न्यायालयाला धाक दाखवून कुणीही कोणतीही गोष्ट करवून घेऊ शकत नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

एसआयआर प्रक्रियेतल्या अनियमितता आणि मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावं यादीतून वगळल्यासंदर्भात राहुल गांधी आणि इतर नेत्यांनी दाखल केलेल्या स्वतंत्र याचिकेवर, न्यायालयानं निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांच्याकडून उत्तरं मागवली आहेत. याच मुद्द्यावरच्या इतर याचिकांना ही याचिका जोडून घेऊ, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं सांगितलं.

निवडणूक आयोगासंदर्भातल्या याचिकांवर न्यायालयानं केंद्र सरकार आणि इतरांनाही नोटिसा बजावल्या. जंतरमंतरचं नाव अधिकृत आंदोलन स्थळांच्या यादीतून काढून टाकायच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिकाही न्यायालयानं स्वीकारली. दिल्लीत एसआयआरविरोधी आंदोलनादरम्यान मेट्रो आणि रेल्वेसेवांवर निर्बंधांसंबंधी सर्वोच्च न्यायालयानं १० ऑक्टोबर रोजी दिलेल्या निर्देशांचं उल्लंघन केल्याप्रकरणी सरकारनं बिनशर्त माफी मागितलेली नाही. केवळ प्रक्रियेचा भाग म्हणून ‘बिनशर्त माफी’ असं नमूद केल्याचं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

राज्य सरकारनं सुट्या मसाल्यांच्या विक्रीवर बंदी घातली आहे. अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. मसाल्यांच्या पाकिटावर उत्पादनाचं नाव, त्यातले घटक पदार्थ, उत्पादकाचा तपशील, उत्पादनाची आणि पॅकेजिंगची तारीख, एक्सपायरी डेट असे सर्व तपशील ठळकपणे नमूद करणं बंधनकारक असणार आहे. तसंच मसाल्यांचं वजन आणि प्रमाण वाढवण्यासाठी विटांची भुकटी, खडू, लाकडाचा भुसा, किंवा इतर तत्सम पदार्थ मिसळणं, निकृष्ट दर्जाच्या मसाल्यांचं मिश्रण करणं किंवा अर्क काढलेल्या मसाल्याची विक्री करायला परवानगी नाही, अशी माहिती मुंढे यांनी दिली. याशिवाय मसाल्यात मेटॅनिल यलो, ऱ्होडामाईन बी, सुदान डाईज, लेड क्रोमेट असे प्रतिबंधित रंग वापरायला सक्त मनाई असेल. मसाल्यांची शुद्धता, सेंद्रीयता, नैसर्गिकता आणि आरोग्याच्या लाभांविषयी पुरावे नसताना दावे करणाऱ्यांवर नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल, असंही मुंढे यांनी सांगितलं.

मसाल्यांचं उत्पादन आणि साठवणुकीत स्वच्छतेच्या दृष्टीनं, सार्वजनिक रस्ते, डांबरी पृष्ठभाग, गटारं, कचराकुंड्या किंवा जनावरांच्या गोठ्याजवळ मसाले वाळवता येणार नाहीत,

मसाल्यांबरोबर रसायनं, कीटकनाशकं, औद्योगिक रंग किंवा इतर हानीकारक पदार्थ साठवायला मनाई असल्याचंही ते म्हणाले.

<><><><>

नवरात्र, दिवाळी आणि ख्रिसमस यासह वर्षभरातल्या सर्व सण-उत्सवांदरम्यान सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि पदपथांवर फटाके वाजवण्यावर मुंबई उच्च न्यायालयानं पूर्ण बंदी घातली आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या पीठानं आज हा निर्णय दिला. दिवाळीनंतर फटाक्यांच्या प्रदूषणामुळे जगणं अवघड होतं, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना याचा प्रचंड त्रास होतो, असं मत न्यायालयानं नोंदवलं. फटाक्यांचं उत्पादन किंवा विक्रीवर बंदी घातलेली नाही, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं.

<><><><>

नीट पीजी २०२६ च्या उत्तरपत्रिका आणि प्रतिसाद जाहीर करण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकतेची मागणी करणाऱ्या याचिकेवर, सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडून उत्तर मागितलं आहे. सध्याच्या व्यवस्थेत उमेदवारांना आपल्या मूल्यमापनाची स्वतंत्रपणे पडताळणी करण्याची सोय नाही. त्यामुळे प्रत्येक उमेदवाराला परीक्षेतले सर्व प्रश्न आणि उत्तरांचे पर्याय, तसंच त्यांनी नोंदवलेली उत्तरं आणि अचूक उत्तरं पाहण्याची सोय उपलब्ध करावी, अशी मागणी याचिकेत केली आहे. यावर, न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या पिठानं संबंधित प्राधिकरणांना नोटीस बजावली असून, इतर प्रलंबित प्रकरणांबरोबर या याचिकेवर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत.

<><><><>

सुमारे ८५ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचा गैरवापर केल्याप्रकरणी फिटजी या प्रशिक्षण केंद्राचे संचालक दिनेश कुमार गोयल आणि मोनिला गोयल या दाम्पत्याविरोधात ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने आरोपपत्र दाखल केलं आहे. उत्तर प्रदेशात गाझियाबाद इथल्या विशेष पीएमएलए न्यायालयात हे आरोपपत्र दाखल केलं. कोणतीही पूर्वसूचना न देता प्रशिक्षण केंद्रांच्या शाखा अचानक बंद करणं, शाखा बंद केल्यानंतरही विद्यार्थ्यांकडून शुल्क गोळा करून ते अन्यत्र वळवणं असे आरोप या दाम्पत्यावर आहेत.

<><><><>

जळगाव जिल्ह्यात जामनेर तालुक्यात ट्रक आणि दुचाकीची धडक होऊन झालेल्या अपघातात सहा जण ठार झाले. अपघातानंतर ट्रकचालक फरार झाला आहे. मृतांमधले सर्व जण मध्य प्रदेशातले रहिवासी आहेत. जामनेर तालुक्यात मालदाभाडी गावाजवळ हा अपघात घडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

<><><><>

बँका, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्या आणि रिलायन्सच्या समभागात झालेल्या तेजीमुळं देशातल्या शेअर बाजारात आज मोठी तेजी झाली. सेन्सेक्सनं आज १ हजार ५३३ अंकांची उसळी घेतली आणि तो ७४ हजार ३१६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३७५ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ९९७ अंकांवर बंद झाला.

<><><><>

SIR मधून वगळल्या गेलेल्या मतदारांसाठी केंद्रीय निवडणूक आयोग १७ आणि १८ ऑक्टोबर, तसंच २४ आणि २५ ऑक्टोबर रोजी राज्यभरातल्या सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिर घेणार आहे. BLO या ठिकाणी उपस्थित असतील अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे.

<><><><>

अमेरिकेला निर्यात होणाऱ्या भारतीय मालात वाढ झाली असून एप्रिल ते सप्टेंबर या सहामाहीत ही निर्यात सुमारे ५१ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. गेल्या वर्षीच्या या कालावधीत भारताने अमेरिकेला ४५ अब्ज ७३ लाख डॉलर्स किमतीचा माल निर्यात केला होता. अमेरिकेने टॅरिफ निर्बंध लागू केल्यानंतर ही वाढ नोंदली गेली. या काळात अमेरिकेकडची आयातही २६ टक्क्यांनी वाढली आहे. भारत अमेरिका व्यापार कराराची वाटचाल योग्य दिशेने होत आहे, असं केंद्रीय वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितलं.

<><><><>

पाकिस्तानमध्ये पेशावर इथं आज एका खासगी शाळेचं छत कोसळून झालेल्या अपघातात ३५ जणांचा मृत्यू झाला, तर ४० पेक्षा जास्त लोक जखमी झाले. मृतांमध्ये ३४ विद्यार्थी आणि एका शिक्षकाचा समावेश आहे. शाळेची इमारत दाट लोकवस्तीच्या भागात अरुंद गल्लीत असल्यामुळे बचाव कार्यात अडथळा आला. शाळेच्या संस्था चालकांना अटक करण्यात आली असून, या इमारत दुर्घटनेची चौकशी केली जाईल असं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

नैर्ऋत्य मोसमी पावसानं देशभरातून माघार घेतल्याचं भारतीय हवामानशास्त्र विभागानं जाहीर केलं आहे. यंदाच्या मोसमात देशभरात ७६९ पूर्णांक ४ दशांश मिलीमीटर पाऊस झाला असून तो सरासरीपेक्षा १२ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांनी कमी आहे. यंदा एलनिनो प्रभावामुळे पावसात तूट आली असून हा प्रभाव डिसेंबर अखेरपर्यंत वाढत जाईल आणि फेब्रुवारी २०२७ पर्यंत राहील, अशी शक्यता जागतिक हवामानशास्त्र संघटनेनं वर्तवली आहे.

<><><><><>

विद्यार्थ्यांसोबत कसलाही भेदभाव करू नका, त्यांची जात, जेईई सारख्या प्रवेश परीक्षांचे मार्क अशी कोणतीही माहिती त्यांना विचारू नका असे नियम आयआयटी मुंबईनं जाहीर केले आहेत. विद्यार्थी, शिक्षकांसह अन्य कर्मचाऱ्यांना देखील हे नियम लागू असतील. २२ वर्षीय साहिल वाकोडे याची आत्महत्या आणि त्यानंतर त्याच्या पालकांनी केलेले भेदभावाच्या वागणुकीचे आरोप यानंतर हे नियम आणण्यात आले आहेत.

//<><><><><>//